# प्रेस नोट ता. २७/०६/२०२०

## शौकेखातर महागडी वाहने चोरणारी टोळी गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन गजाआड, ४,५०,०००/- रु.किं. ची ०६ महागडी वाहने जप्त

मा.पोलीस आयुक्त सो, पिपरी-चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड परिसरात घडणारे वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन घडलेले गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेश दिल्याने पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा युनिट ४ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक मोहन शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली रेकॉर्ड वरील वाहन चोरीचे व इतर गुन्हेगार यांची तपासणी सुरू असताना. दि. २६/०६/२०२० रोजी पोशि/ १५१६ सुरेश जायभाये आणि पोशि/ २३६२ आजिनाथ ओंबासे यांना मिळालेल्या गुप्त बातमी वरुन मोरवाडी पिंपरी येथे गुन्हे शाखा युनिट ४ चे पथका मार्फत सापळा लावुन इसम नामे हर्षल शिवाजी साबळे, वय- १८ वर्षे, रा- रामराज्य प्लॅनेट, फ्लॉट नंबर- ए २०३, लांडे चौक, कासारवाडी पुणे व अर्थव आशोक कोडांवळे, वय- १८ वर्षे, रा- पिंपळे अपार्टमेंट फ्लॉट नंबर- १४ कासारवाडी, पुणे. यांना पकडले असता त्यांच्या ताब्यात एक नंबर प्लेट नसलेली बजाज कंपनीची पल्सर २२० मोटारसायकल मिळुन आली. सदर बाबत त्यांच्या कडे चौकशी करता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने त्यांना वाहनासह ताब्यात घेवुन अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर नमुद दोन्ही आरोपी कडे चौकशी केली असता सदर वाहनाचा क्रमांक एम एच १४ ई एल १९५९ असा असल्याचे व त्याने सदरचे वाहन भोसरी एम आय डी सी पोलीस ठाणे हद्दितुन चोरल्याचे व त्या बाबत गु.र.नंबर- ३००/२०२० भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

त्यामुळे दोन्ही आरोपींकडे कसुन तपास केला असता आरोपी नामे १) हर्षल शिवाजी साबळे, वय- १८ वर्षे, रा- रामराज्य प्लॅनेट, फ्लॉट नंबर- ए २०३, लांडे चौक, कासारवाडी पुणे याने त्याचा साथीदार नामे २) अर्थव आशोक कोडांवळे, वय- १८ वर्षे, रा- पिंपळे अपार्टमेंट फ्लॉट नंबर- १४ कासारवाडी, पुणे , ३) गणेश उर्फ परश्या रा- फुले नगर, भोसरी, पुणे व ४) एक विधीसंघर्षीत बालक यांचे सह पिंपरी व भोसरी परिसरात एकुण ०६ महागडया चोरल्याचे सांगितल्याने त्यांच्या कडुन **४,५०,०००/- रु.किं. ची ०६ महागडी वाहने (पल्सर २२०- ३, पल्सर १८०-१, युनिकॉर्न-१, यामाहा आर एक्स १००-१)** जप्त करण्यात आली. त्यानुसार सदर वि.सं.बालकाचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेण्यात आले असुन नमुद दोन्ही आरोपी व वि.सं.बालकास पुढील कारवाई कामी पिंपरी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

आरोपींताकडुन वाहन चोरीचे खालील गुनहे उघडकिस आले आहेत.

1. **पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.नंबर- ३९१/२०२० भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे**
2. **पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.नंबर- ३९७/२०२० भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे**
3. **पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.नंबर- ३९६/२०२० भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे**
4. **भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नंबर- ३१२/२०२० भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे**
5. **भोसरी एम.आय.डी. सी पोलीस स्टेशन गु.र.नंबर- ३००/२०२० भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे**

अटक आरोपी कडे आणखी कसुन तपास करता **आरोपी क्रमांक ०१ व ०२ तसेच त्यांचा आणखी एक वि.स.बालक साथीदार यांनी दि. ३१/०५/२०२० रोजी दत्तवाडी पोलीस ठाणे हद्दित एका तरुणावर प्रेम प्रकरणातुन कोयत्याने जिवघेणा हल्ला केला असल्याचे व त्या गुन्हयात ते फरार असल्याचे निष्पन्न झाले.** सदर गुन्हयातील वि.स.बालकास ही ताब्यात घेण्यात आले असुन पुढील कारवाई कामी **दत्तवाडी पोलीस ठाणे गु.र.नंबर- १९८१/२०२० भा.द.वि.कलम ३०७,३४ आर्म ॲक्ट ४(२५)** येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील, (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे,

सहा. पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ नारायण जाधव, संजय गवारे, प्रविण दळे, धर्मराज आवटे, अदिनाथ मिसाळ, पोना/ संतोष असवले, लक्ष्मण आढारी, मोहम्मद गौस नदाफ, तुषार शेटे, वासुदेव मुंढे पोशि/शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, तुषार काळे, सुखदेव गावंडे व नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे  गुन्हे शाखा युनिट-४ यांनी केली आहे.

